पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/४३/२०२०
दिनांक - ११/०२/२०२०

प्रति,
मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

**विषय** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा
दिनांक २०/०२/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **फेब्रूवारी-२०२०** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०२/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**सूचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ४१**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **फेब्रूवारी- २०२०** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरुवार** दिनांक **२०/०२/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

-----

**नियुक्त्या**

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

-----

**प्रश्नोत्तरे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**मा.स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्रमांक २) संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कर/मुख्य/९/कावि/०६/२०२०, दि.०४/०१/२०२०
**२)** मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३२ दि.५/२/२०२० अन्वये.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार करयोग्य मूल्यामध्ये दुरुस्ती करणेची तरतूद आहे. तसेच अधिनियमातील कलम

99 नुसार महापालिकेने याबाबत कराचे दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याचे 20 तारखेला किंवा तत्पूर्वी निश्चित केले पाहिजेत. सध्याचे करयोग्य मूल्य ठरविणेकामी प्रती चौरस दर हे सन 2015-2016 मान्य करण्यात आलेले आहेत. तसेच कराचे दरामध्ये सन 2013-2014 पासून कोणतीही दरवाढ करणेत आलेली नाही. अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 नियम 20 मधील तरतुदीनुसार जुन्या मिळकतींचे करयोग्यमूल्याचे पुर्न:मुल्यांकन करुन त्यानुसार येणा-या नवीन करयोग्यमूल्यावर मिळकत कराचे बिल लागू करता येईल. याकामी सन 2020-2021 करिता करयोग्यमूल्य ठरविण्यासाठी दोन पध्दतीनुसार सादरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच सोबत खालील पध्दत 1 व पध्दत 2 नुसार सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

पध्दत 1. करयोग्य मूल्य पध्दतीने (रेडी रेकनरचा आधार घेऊन पारंपारिक पध्दतीने)

पध्दत 2. भांडवलीमूल्य पध्दतीने (शासन अधिनियम क्रमांक १०/२०१० दिनांक २७ एप्रिल २०१० नुसार)

वरीलपैकी उचित पध्दतीस करयोग्यमूल्य व कराचे दरास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दसरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ३) संदर्भ-१)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/९९/२०२०, दि.३०/०१/२०२०

**२)** मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६३३ दि.५/२/२०२० अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७, दिनांक २८।०२।२०१८ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १८७, दिनांक २०।०४।२०१८ अन्वये पाणीपट्टी दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार पाणीपट्टी आकारण्यांत येत आहे. सद्यस्थितीत शहरात पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि प्रत्येक नळ जोडावरील पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य नाही. सबब ज्या ठिकाणी विशेषत: उताारावरील भागात जास्त पाणी उपलब्ध होते. त्यामुळे तेथे मानका पेक्षा जास्त पाणी वापर करण्याची प्रवृत्ती दिसते व उंचावरील भागात पाण्याचा तुटवडा जाणवतो. समन्यायी पाणीपुरवठा करण्यासाठी १०० LPCD पेक्षा जास्त पाणीवापर करणा-या ग्राहकांवर वचक ठेवण्याच्या दृष्टीने १०० LPCD पेक्षा जास्त पाणी वापरासाठी जास्त दर लावणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन पाणीपट्टीचे सुधारित दर प्रस्तावित करण्यांत येत आहेत, तसेच त्यानंतर दरवर्षी प्रस्तूत आदेशातील सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक ५ टक्के वाढ प्रस्तावित करणेत येत आहे.

## पाणीपट्टी प्रस्तावित दर

**१) निवासी वापरासाठी प्रति कुटुंब / सदनिका प्रति महिना**
(झोपडपट्ट्यांमधील व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड वगळून)

| अ.क्र. | LPCD | प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर ( लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०१९-२० | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु.०.०० | र.रु.०.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु. ४.२० | र.रु.८.०० |
| ३ | १०१-१३५ | १५००१ ते २०००० | र.रु.४.२० | र.रु.४०.०० |
| ४ | १३५ च्या पुढे | २०००१ च्या पुढे | र.रु.८.४० | र.रु.१००.०० |

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्स पेक्षा ( १३५ LPCD ) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.८.०० हा दर लागू राहील.

**२)** वाणिज्य वापरासाठी प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट हॉटेल्स, रेस्टॉरंटस, दुकाने, इ.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.५२.५० |
| सन २०२०-२१ | र.रु.५५.०० |

**३)** खाजगी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, रेल्वे स्टेशन्स, ईएसआय हॉस्पीटल, ऑटो क्लस्टर, औंध ऊरो रुग्णालय.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.१५.७५ |
| सन २०२०-२१ | र.रु.१७.०० |

४) धार्मिक स्थळे, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, धर्मादाय आयुक्त यांची मान्यता असलेली ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणारी मंडळे.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.१०.५० |
| सन २०२०-२१ | र.रु.११.०० |

**५) स्टेडीयम**.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.२१.०० |
| सन २०२०-२१ | र.रु.२२.०० |

**६) मनपा इमारती / मिळकतीं – Book Adjustment करिता**

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु. १०.५० |
| सन २०२०-२१ | र.रु.११.०० |

**७) हद्दीबाहेरील निवासी इमारती – देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड**

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील निवासी इमारतींसाठी देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डास खालीलप्रमाणे सरसकट दराने पाणी देण्यात येईल.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०२०-२१ | र.रु.११.०० |

८) **झोपडपट्टीसाठी धोरण** – झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी  पध्दतीने दर प्रस्तावित करणेत येत आहेत.

अ) प्रस्तावित दर (मीटर बसविलेल्या झोपडपट्टी/झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड ग्राहकांसाठी निवासी वापरासाठी प्रति कुटुंब। सदनिका प्रति महिना)

| अ.क्र. | LPCD | प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर (लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०१९-२० | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु.०.०० | र.रु.०.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु.२.१० | र.रु.४.०० |
| ३ | १०१-१३५ | १५००१ ते २०००० | र.रु.३.१५ | र.रु.४०.०० |
| ४ | १३५ च्या पुढे | २०००१ च्या पुढे | र.रु.८.४० | र.रु.१००.०० |

प्रति माह प्रति सदनिका २०००१ लिटर्सपेक्षा (१३५ LPCD) जास्त पाणी वापर करणा-या ग्राहकांना उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली पहिल्या ६००० लिटर्स प्रति माह प्रति सदनिका इतक्या पाणी वापरासाठीची शून्य दराची सूट लागू राहणार नाही. अशा ग्राहकांना १ ते ६००० लिटर्स पाणी वापरासाठी उपरोक्त तक्त्यातील ६००१ ते १५००० या स्लॅबमधील दर लागू राहील, म्हणजे अशा ग्राहकांना प्रति माह प्रति सदनिका १ ते १५००० लिटर्स या स्लॅबसाठी उपरोक्त तक्त्यातील र.रु.४.०० हा दर लागू राहील.

आ) मीटर न बसविलेल्या झोपडपट्टीतील/ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ग्राहक

i) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (वापर १३५ LPCD प्रमाणे)

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींना प्रति सदनिकाप्रमाणे मासिक बिल देण्यांत यांवे.

| आर्थिक वर्ष | दर प्रति महिना प्रति सदनिका |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.३६.७५ |
| सन २०२०-२१ | र.रु.३८.६० |

ii) झोपडपट्टी वैयक्तिक नळजोड (वापर ९० LPCD प्रमाणे)

झोपडपट्ट्यांमधील वैयक्तिक नळजोडाची पाणीबिले वार्षिक पध्दतीने देण्यात यावीत.

| आर्थिक वर्ष | दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.१९८.०० |
| सन २०२०-२१ | र.रु.२१०.०० |

iii) झोपडपट्टीतील गट नळजोड (Group Connection)

१५ मिमी व्यास -५ कुटुंबे (वापर ७० LPCD प्रमाणे)

| आर्थिक वर्ष | दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड |
|---|---|
| सन २०१९-२० | र.रु.५६७.०० |
| सन २०२०-२१ | र.रु.६००.०० |

अनधिकृत नळजोड नियमित करणे व त्यांना आकारावयाच्या पाणीदराबाबत यापूर्वीचेच धोरण कायम ठेवण्यात येत आहे. सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताही प्रासंगिक वाद उद्भवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील. तरी उपरोक्तप्रमाणे पाणी दर बदला बाबतच्या धोरणास मान्यता देणेकामी मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ४) संदर्भ-१)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/शअ/ता/४/५३/२०२० दि.०४/०२/२०२०

**२)** मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.६६३९ दि.५/२/२०२० अन्वये.

महानगरपालिका हद्दीमधील रस्त्यास विविध संस्था त्यांचेकडील भुमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी महापालिकेकडे रस्ता खोदाईस परवानगीची मागणी करतात.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २३९ नुसार सदर संस्थांना महानगरपालिके मार्फत रस्ता खोदण्यास परवानगी देण्यात येते. सदर रस्त्यांवर सेवा वाहिन्या साठी खोदकाम केल्यानंतर सुरळीत वाहतुकीसाठी रस्ते दुरूस्त/पुर्ववत करणे आवश्यक असते. सद्यस्थितीत बांधकाम साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ यात बाजारभावातील होत असलेली भरमसाठ वाढ व यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरच्या भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने मनपास रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करावा लागतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २४१ नुसार सदर भांडवली खर्च हा काही प्रमाणात वसुल व्हावा या करीता अशा संस्था/कंपनी यांना रस्ता खोदाईस परवानगी देताना मा.आयुक्त यांचा दि.६/१/२०१७ च्या मान्य प्रस्तावानुसार रस्ते दुरूस्त/पुर्ववत करणेसाठी सा.बां.विभाग पुणे यांचेकडील सन २०१६-१७ च्या दरसुची नुसार येणारे शुल्क सद्यस्थितीत वापरले जात आहे. त्यानुसार रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाच्या शुल्काबाबतचे परिपत्रक अन्वये शहर अभियंता कार्यालयाकडून दि.३/३/२०१७ रोजी निर्गत करण्यात आलेले आहे. सदर रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाचे सद्यस्थितील शुल्क ठरविताना चराची रूंदी ही रोड रोलरची १.८ मी. इतकी रूंदी गृहीत धरून ठरविणेत आले आहे.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत रस्ता खोदाई केलेनंतर रस्ते पुर्ववत करणेसाठी खाली प्रमाणे दर आकारण्यात येत आहे.

प्रपत्र अ) : रस्ता पुर्ववत करण्यासाठी आकारावयाचे शुल्क

| अ.क्र. | रस्त्याचा प्रकार | सुधारीत दर र.रू. |
|---|---|---|
| | | (चराची रूंदी कमीतकमी १.८० मी) |
| १) | जमिनीमधुन खोदकाम | १९९०/- प्रति मीटर |
| २) | खडीमुरूम बीबीएम/एमपीएमसह | ३६५९/- प्रति मीटर |

| | | |
|---|---|---|
| ३) | डांबरी रस्ता | ९३३३/- प्रति मीटर |
| ४) | डांबरी रस्ता (पुर्ण जाडी) | |
| ५) | फुटपाथ | ८१३९/- प्रति मीटर |
| ६) | पेव्हींग ब्लॉक | ६२६७/- प्रति मीटर |

प्रपत्र ब) : मनपा अधिभार

| अ.क्र. | रस्ता रुंदी (मीटर) | मनपा अधिभार | |
|---|---|---|---|
| | | रस्त्याला समांतर खोदाई असल्यास | रस्त्यावर काटकोन खोदाई असल्यास |
| १ | १८ मी. पेक्षा कमी | रु. १५००/ प्रती मीटर | रु. ७०००/ प्रती मीटर |
| २ | १८ मी.ते ३० मी. खालील | रु. २०००/ प्रती मीटर | रु. १०,०००/ प्रती मीटर |
| ३ | ३० मी. ते ४५ मी. खालील | रु. २५००/ प्रती मीटर | रु. १२,०००/ प्रती मीटर |
| ४ | ४५ मी. व त्यापुढे | रु. ३०००/ प्रती मीटर | रु. १५,०००/ प्रती मीटर |

केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, एम.एन.जी.एल. व शासनाच्या इतर अंगीकृत संस्था यांना पुणे महानगरपालिका हद्दीत भूमिगत केबल टाकणेसाठी पुणे मनपाचे मान्य रस्ते खोदाई शुल्कामध्ये चालू दराच्या ५०% सवलत देणेबाबतचा ठराव पारित केलेला आहे. पुणे महानगरपालिकेकडून महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना रस्ता खोदाई करणेसाठी र.रू.२७७४ प्रती रनिंग मी. इतका दर आकारला जातो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात भूमिगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी रस्ते खोदाईस परवानगीच्या चालू दरामध्ये सवलत मिळणेबाबत मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी विनंती केलेली आहे.

<u>महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.यांचेकडील मागणीः-</u>

महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी महानगरपालिकेकडील दर जास्त असल्याने रस्ते दुरुस्तीचे दर कमी करुन पुणे महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना देण्यात येणा-या दरातील सवलतीनुसार भूमिगत गॅस पाईप लाईन टाकणेसाठी रस्ते खोदाईस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

घरगुती स्वयंपाक व इतर वापरासाठी तसेच, शहरातील वाढत असलेल्या मोठ्या प्रमाणातील प्रदुषण रोखण्यासाठी चार चाकी वाहनांसाठी नैसर्गिक वायूचा वापर करण्याचा केंद्र शासनाने महत्वकांक्षी उपक्रम हाती घेतलेला आहे. त्याचप्रमाणे, शहरी भागात सी.एन.जी. चा वापर वाढवून घरगुती वापरातील एल.पी.जी. सिलेंडर ग्रामिण भागासाठी जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. नैसर्गिक वायू ( सी.एन.जी.) हा एल.पी.जी. पेक्षा सुरक्षीत व स्वस्त असल्याने व २४ तास अखंडीत पुरवठ्याची शास्वती असल्याने शहरातील नागरिकांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. शहरात अशाप्रकारच्या नैसर्गिक वायूचे ( सी.एन.जी.) भुमिगत पाईपलाईन टाकणेचे व पुरवठा करण्याचे कामकाज महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.यांचे मार्फत चालू आहे.

भुमिगत गॅसवाहिनी शहरातील नागरिकांसाठी उपयुक्त असल्याने त्यासाठी महानगरपालिकेचे देखील योगदान असणे आवश्यक वाटते. त्यासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना भुमिगत गॅसवाहिनी टाकण्यासाठी आवश्यक असणा-या रस्ता खोदाई परवानगीसाठी महापालिकेमार्फत आकारण्यात येणारे शुल्कात सवलत देऊनरस्ता खोदाई केलेनंतर रस्ता पुर्ववत करणेसाठी Lumpsum र.रू.३०००/- प्रती र.मी. इतके शुल्क आकारून मनपा अधिभार माफ करणे आवश्यक आहे. तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये मे.महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना रस्ते खोदाईच्या चालू दरामध्ये सवलत देऊन रस्ता खोदाई कलेनंतर सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या प्रकारासाठी (जमिनीतून खोदकाम, खडीमुरूम बीबीएम/एमपीएम सह, डांबरी रस्ता पुर्ण जाडी, फुटपाथ व पेव्हींग ब्लॉक) रस्ता पुर्ववत करणेकरीता Lumpsum र.रू.३०००/- प्रती र.मी. इतके शुल्क आकारून मनपा अधिभार माफ करणेसाठीच्या धोरणात्मक निर्णयासाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांची मगाणी असली तरी, MNGL कंपनीकडून मनपाचे सर्व प्रकारचे विकास कामे करतांना MNGL कंपनीच्या गॅस लाईन वरून काम करणेसाठी विविध प्रकारचे चार्जेस MNGL कंपनीस अदा करावे लागतात त्यामध्ये मनपास सवलत मिळणे आवश्यक आहे. तरी MNGL कंपनीस मनपाकडून रस्ते खादाई सवलत देताना मनपाच्या कामांसाठी MNGL कंपनीकडून विविध प्रकारचे चार्जेस माफ करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक ५) संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/१४२/२०२० दि.०४/०२/२०२०

**२)** मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६४१ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्कींग पॉलिसीस) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६३९, दि.०९/०५/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.२०५, दि.२२/०६/२०१८ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्याअन्वये पिंपरी चिंचवड शहरातील पार्किंग पॉलिसी नुसार शुल्क आकारणेबाबत निविदा क्र.४८/२०१९-२०२० प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा स्विकृतीचा कालावधी तीन वेळेस वाढविणेत आला तथापि वाढविलेल्या निविदा स्विकृत कालावधी मध्ये एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे उपरोक्त मा.महापालिका सभा ठराव क्रमांक अन्वये मंजुर करणेत आलेले दर खालीलप्रमाणे सुधारीत करणे आवश्यक आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| वाहनाचा प्रकार | Zone A, Zone B, Zone C साठीचे दर र.रू.प्रति तास |
|---|---|
| दुचाकी | ५/- |
| रिक्षा | ५/- |
| चारचाकी | १०/- |
| टेम्पो/चारचाकी मिनी ट्रक | १५/- |
| मिनी बस | २५/- |
| खाजगी बस | १००/- |
| ट्रक/ट्रेलर | १००/- |

सदर पार्किंग पॉलिसीच्या कामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून Parking App तयार करून पार्किगचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३(अ)(१) नुसार सुधारित दरास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ६) संदर्भ- १)** मा.राजेंद्र गावडे, मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव-

**२)** मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६४९ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये निगडी-दापोडी रस्त्यावर पिंपरी ते स्वारगेट या मेट्रो मार्गिकेचे काम महामेट्रो मार्फत करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपा ते स्वारगेट या मार्गिकेची लांबी१६.५९ कि.मी. असुन त्यापैकी पिंपरी ते दापोडी असा ७ कि.मी. मार्गिका व ६ स्टेशन्स पिंपरी

चिंचवड मनपा हद्दीमध्ये येत आहे. या प्रकल्पासाठी केंद्रशासन, राज्यशासन व पिंपरी चिंचवड व पुणे मनपा यांचेकडुन अर्थ सहाय्य करणेत येत आहे. भविष्यात मेट्रोचे काम निगडी पर्यंत सुमारे ५.५० कि.मी. लांबीचे करणेत येणार आहे.पिं.चिं.मनपा हद्दीमधील मेट्रो प्रकल्पाच्या खर्चाच्या १०% हिस्सा पिं.चिं.मनपास देय आहे. पिंपरी ते स्वारगेट या मार्गिकेचे काम पुणे मेट्रो या नावाने करणेत येत आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड मनपाचा / शहराचा कुठेही समावेश करणेत आलेला नाही. पिंपरी चिंचवड मनपा देशामध्ये विकासाभिमुख मनपा म्हणुन ओळखली जाते. तरी शहरातील नागरिकांच्या भावनांचा विचार करता तसेच शहराचे अस्मितेचा विचार करता 'पुणे मेट्रो' ऐवजी 'पुणे पिंपरी चिंचवड मेट्रो' असे नामकरण करणेत यावे. तसेच मा.महापौर, उप महापौर, स्थायी समिती-अध्यक्ष सर्व गटनेते व सर्व नगरसदस्य यांनीही अशा प्रकारचे नामकरण करणेबाबत मागणी केली आहे. तसेच पिंपरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, पिंपरी येथे मेट्रो स्टेशनचे काम चालु आहे. या चौकामधील ग्रेडसेपरेटरला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विलगक तसेच चौकामधील बीआरटी बस स्टेशनला आहिल्यादेवी होळकर चौक, मोरवाडी असे नामकरण करणेत आलेले आहे. त्याच धर्तीवर या चौकामधील मेट्रो स्टेशनला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, पिंपरी असे नाव देणेबाबत मागणी आहे. तरी पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सध्या चालु असलेल्या मेट्रोस 'पुणे मेट्रो'ऐवजी 'पिंपरी चिंचवड पुणेमेट्रो' व मोरवाडी चौकातील मेट्रो स्टेशनला 'पिंपरी'ऐवजी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, पीसीएमसी पिंपरी मेट्रो स्टेशन'असे दुरुस्ती नामकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ७) संदर्भ- १)** मा.झामाबाई बारणे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव –
**२)** मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५४ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर ०७ रुग्णालये व २८ दवाखाने कार्यरत आहेत. सदर दवाखाना व रुग्णालयांमध्ये व वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये मनुष्यबळाअभावी रुग्णसेवा देणेकामी अडचण होत आहे. तसेच याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे वैद्यकिय अधिकारी/ तज्ञ वैद्यकिय अधिकारी व इतर पॅरामेडिकल पदे आवश्यकतेनुसार तातडीने भरुन रुग्णसेवा सुरळीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार आज दि.०५-०२-२०२० रोजीच्या मा.स्थायी समिती सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार रुग्णालयातील आवश्यक पदे भरणेसाठी प्रशासनाने वाय.सी.एम. रुग्णालय व वैद्यकिय विभागांतर्गत आवश्यक पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकामी सविस्तर पदांच्या आवश्यकतेनुसार सोबतचे प्रपत्र अ व प्रपत्र ब नुसार प्रशासनामार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहेत.

**विषय क्रमांक ८) संदर्भ- १)** मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

**२)** मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६६५५ दि.५/२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थेरगाव स.नं.९ मधील मनपा उपयोगासाठी आरक्षित जागेवर BOT तत्त्वावर व्यापारी केंद्र बांधणेस मनपा सभा ठराव क्र.४५९४, दि.२९/१०/२००१ अन्वये मान्यता मिळाली होती. याबाबत तत्कालीन नगरसदस्यांचे नुसार मनपामार्फत कामाची निविदा प्रसिध्द केली. सदर प्रकल्पाबाबत BOT कमिटी मध्ये र.रु.६.१० कोटीच्या प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर दि.१३/०७/२०१० रोजी पात्र निविदा धारक मे.ओम प्रॉपर्टीज यांचे समवेत दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करारनामा करणेत आला. करारनामा केलेनंतर भुमी जिंदगी विभागामार्फत दि.१४/०९/२०१० रोजी मे. ओम प्रॉपर्टीज यांना जागेचा ताबा देणेत आला. तथापि, मा.नगर सदस्यांच्या मागणीनुसार भुमी जिंदगी विभागामार्फत दि.०२/१०/२०१० रोजी ताबा दिलेल्या जागेचा ताबा स्थगित करणेत आला. सदरचे जागेचा ताबा न मिळाल्याने मे.ओम प्रॉपर्टीज यांनी दि.०२/११/२०११ रोजी मा. उच्च न्यायालय मुबंई येथे दावा दाखल केला. सदर दाव्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये मनपा मार्फत मा.अति.आयुक्त यांनी सदर प्रकरणी मे.ओम प्रॉपर्टीज यांचे समवेत सुनावणी घेऊन दि.०६/०३/२०१२ रोजी मनपाने मा. उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केल्यानुसार प्रकल्प रद्द केला असलेने जागेचा ताबा देता येणे शक्य नाही असा आदेश दिला. सदरचे अति.आयुक्त यांनी दिलेला आदेश रद्द करणेबाबत मे.ओम प्रॉपर्टीज यांनी पुन:श्च मनपा विरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये दि.१३/०४/२०१२ रोजी दावा दाखल केला. सदरचे दाव्याबाबत मनपामार्फत त्यानुसार मे.ओम प्रॉपर्टीज यांना दि.२५/०३/२०१३ रोजी सदरचा प्रकल्प का रद्द करणेत येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली. त्यानुसार दि.०९/१०/२०१४ रोजी पुढील प्रमाणे आदेश निर्गत केले. यामध्ये मे.ओम प्रॉपर्टीज यांनी करारनामा कलम १२.१ नुसार सदरचे प्रकरण आर्बिट्रेशन लवादाकडे देणेत यावे. असे नमुद केले.सदरचे मा. अति. आयुक्त यांनी दि.०९/१०/२०१४ रोजी दिलेला आदेश रद्द करुन जागेचा ताबा मिळणेकामी मे.ओम प्रॉपर्टीज यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये दि.०७/०४/२०१५ रोजी दावा दाखल केला. सदर दाव्याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दि.०८/०१/२०२० रोजी सुनावणी झाली व दि.११/०१/२०२० रोजी मा.उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश दिले. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयाने ९० वर्ष भाडे करारापोटी देय असलेली एकुण र.रु.१२.०० कोटी इतकी निश्चित करुन सदरची रक्कम मे.ओम प्रॉपर्टीज यांनी मनपास द्यावयाची आहे. तथापि, सद्यस्थितीमध्ये मनपाकडे अतिरीक्त जागा उपलब्ध नसल्याने सदर ठिकाणी मनपाचे कचरा संकलन केंद्र असुन उर्वरीत जागा ही खेळाचे मैदान म्हणुन वापरण्यात येत आहे. सदरची जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून मनपास मिळालेली आहे.

त्यामुळे शासन मान्यता नसताना सदरची जागा देता येणार नाही. सदर आरक्षीत जागा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे. ज्या कामासाठी जागा दिली आहे. त्याच कामासाठी सदर जागेचा वापर होणे गरजेचे आहे. सदर न्यायालयीन प्रक्रीयेत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास सहभागी करुन घेणेत यावे. तसेच सदर प्रकरणी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा अभिप्राय घेणेत यावा. मनपास जागेची आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मे.ओम प्रॉपर्टिज यांना जागेचा ताबा न देता या निर्णयाच्या विरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयात मनपा मार्फत अपिल दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.

-----

## <u>मा.विधी समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक ९) संदर्भ-** १) मा.मनिषा पवार व मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७ दि.१७/१/२०२० अन्वये.

विद्युत विभागाच्या उप अभियंता विद्युत या पदाचे अंतिमसेवा जेष्ठता यादी दि.१८/१२/२०१२ रोजी प्रसिद्ध करणेत आलेली आहे. सदर सेवा जेष्ठता यादी तयार करताना प्रशासन विभागामार्फत उप अभियंता घोडे व मोरे हे एकाच दिवशी उप अभियंता पदावर पदोन्नती द्वारे रुजु झाल्याने श्री.घोडे हे वयाने श्री.मोरे यांच्या पेक्षा मोठे असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतुदी नुसार श्री.घोडे यांना सेवाजेष्ठता यादीत श्री.मोरे यांचे आधी सेवाजेष्ठता क्रमांक मंजूर करणेत आला आहे. सदर बाबीस श्री.मोरे उप अभियंता (वि) यांनी हरकत घेतली असता प्रशासनाने वरील नियमाच्या आधारे श्री.मोरे यांची हरकत फेटाळून लावलेली आहे. तसेच याच सेवा जेष्ठता यादीत दि.२८/०८/२००८ रोजी पदोन्नती होवून रुजु होणारे उप अभियंता श्री.चव्हाण एम.एम, श्री.धुमाळ दिलीप, श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर हे एकाच दिवशी रुजू झालेले असून सुद्धा वरील महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतूदीनुसार वयाने अनुक्रमे श्री.सोनवणे माधव, श्रीमती लता बाबर, श्री.दिलीप धुमाळ व श्री.चव्हाण माणीक या क्रमाने सेवा जेष्ठता क्रम देणे आवश्यक होते परंतु प्रशासन विभागाने चुकीने श्री.चव्हाण माणिक, श्री.दिलीप धुमाळ, श्री.माधव सोनवणे व श्रीमती लता बाबर असा सेवा जेष्ठता क्रम चुकविलेला आहे. त्यामुळे सेवा जेष्ठ असणारे श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर यांचेवर पुढील पदोन्नती साठी अन्याय होत आहे. त्यामुळे सदरची उप अभियंता विद्युत या पदाची सेवाजेष्ठता यादी दुरुस्त

करुन श्री.सोनवणे माधव व श्रीमती लता बाबर यांचेवर होणारा अन्याय दूर करणे अत्यावश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा जेष्ठतेचे विनियमन १९८२ मधील जेष्ठतेची सर्वसाधारण तत्वे ४(३) मधील तरतुदी नुसार श्री.घोडे व श्री.मोरे यांना दिलेल्या सेवा जेष्ठतेचे नियमानुसार श्री.माधव सोनवणे व श्रीमती लता बाबर, श्री.दिलीप धुमाळ व श्री. माणिक चव्हाण या क्रमाने सेवा जेष्ठता यादी दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात तसेच सद्या विद्युत विभागाचे अस्थापनेवरील कार्यकारी व उपअभियंता (वि) पदाचे दुरुस्त सेवाजेष्ठता यादी नुसार सेवाजेष्ठता ठरणारे उप अभियंता श्री.माधव सोनवणे यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १०) संदर्भ-** १) मा.कमल घोलप व मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३० दि.०७/०२/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ३५ लाख पेक्षा जास्त झाडे आहेत. त्यांचे जतन व संरक्षण करणे करीता महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अंमलात आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन तरतुदीनुसार प्रकरण ३ कलम ५(१)(२)नुसार वृक्षअधिकारी नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिका स्थायी अस्थापनेवर 'वृक्ष अधिकारी' (गट-अ) या अभिमानाचे एक पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीत एक नवीन पद (प्रपत्र अ) मनपा अस्थापनेवर निर्माण करण्यास तसेच सदर पद निर्माण करुन श्री.प्रकाश मोगल गायकवाड "उद्यान अधिक्षक" (वृक्ष) या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत पात्र असल्याने त्यांची 'वृक्षअधिकारी' (गट-अ) या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

प्रपत्र अ

वृक्षसंवर्धन विभागासाठी नव्याने वर्ग- १ पद निर्माण करावयाचे माहितीपत्रक

| अ. क्र. | पदाचे नांव | वतेनश्रेणी | मंजुर पद | नव्याने निर्मिती करावयाची पदे अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | वृक्षअधिकारी (वर्ग - १) | १५६०० – ३९१००-६६००(ग्रेडवेतन) | ०१ | १००% पदोन्नतीने उद्यान अधिक्षक (वृक्ष) वर्ग २ या पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्रमांक ११) संदर्भ-** १) मा.कैलास बारणे व मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.
२)मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.१६ दि.८/१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७ /९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.०० मी. रुंद रस्ता व १२.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै. मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. (स.नं.१५ पै.) व १२.०० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.०० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-----

<u>**मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे**</u>

**विषय क्रमांक १२) संदर्भ** - १) मा.महापलिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्था/EWSप्र/७०/२०२० दि.१८/१/२०२०
२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
स्था/EWSप्र/७१/२०२० दि.१८/१/२०२०
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ५०६
दि.२०/०१/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शन सुचनांचा अवलंब करुन ठिकठिकाणी आरक्षित जागांवर सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना राबविणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या योजनेकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र.३९, दि.२०/०६/२०१७ मंजूर आहे. सदर ठरावानुसार सद्यस्थिती च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प चालू आहेत.

सदर योजनेअंतर्गत विकास आराखड्यातील EWS, HDH आरक्षित जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी २.५ चटई निर्देशांक वापरुन प्रकल्पास शासन मान्यता घेऊन बांधकाम परवानगी नियमानुसार (DCR) पर्यावरण विभागाच्या परवानगी प्राप्तीनंतर प्रकल्प राबविणेत येत आहे. त्यानुसार सद्यस्थितीत खालील प्रकल्पांचे सुरवात करणेत आली आहे. सदर प्रकल्पामध्ये १४ ते १५ मजली इमारतीमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्राच्या सदनिका बांधणेचे नियोजन आहे.

सदर योजना ही खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (Affordable Housing in Partnership) या घटकाचा अवलंब करुन राबविणेत येत आहे. या घटकांतर्गत केंद्र शासनाकडून १.५ लक्ष प्रति सदनिका इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या घटकाखाली ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत. या घटकाखाली राज्य शासनामार्फत प्रति घरकुल र.रु.१ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. त्यानुसार खालील प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती, केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती यांचे मान्यतेने राबविणेस मान्यता घेण्यात आली आहे.

पंतप्रधान आवास योजनेचे पिंपरी चिंचवड शहरातील इच्छुक लाभार्थींना लाभ करुन देणेकामी मा.महापौर यांचे समवेत सर्व पक्षनेते यांच्या झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे प्रक्रिया पार पाडणेबाबत निर्णय घेणेत आले आहेत.

१) दिलेल्या कालावधीमध्ये इच्छुक लाभार्थीने मनपाने दिलेल्या लिंकद्वारे आवश्यक फॉर्म ऑनलाईन भरुन, सदर फॉर्मची प्रिंट काढून तो नागरी सुविधा केंद्राकडे प्रस्तृत करावयाचा आहे.

२) नव्याने फॉर्म भरणारे - ज्या लाभार्थ्यांनी यापुर्वीच्या सर्वेक्षणात भाग घेतलेला नव्हता त्यांनी स्वतःचा फॉर्म व कागदपत्रे (आधार कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड, वोटर कार्ड, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, बँक पास बुक, वीजबिल, प्रति प्रकल्पासाठी रु.५,०००/- (डी.डी.) डिमांड ड्राफ्ट, २ पासपोर्ट आकाराचे फोटो) तपासणीसाठी पात्रता पडताळणी नागरी सुविधा केंद्राकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याच ठिकाणी सदर फॉर्म व कागदपत्रे व र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल.

३) यापुर्वी फॉर्म भरलेले - ज्या लाभार्थींनी यापुर्वीच्या सर्वेक्षणामध्ये भाग घेऊन अर्ज सादर केला होता त्यांनी फक्त ऑनलाईन फॉर्म भरुन त्याची प्रती सह र.रु.५०००/- चा D.D. जमा केलेनंतर पोहोच पावती देणेत येईल. तसेच मधील कालावधीत नियमानुसार उत्पन्नापेक्षा वाढ अथवा स्वतःचे मालकीचे घर घेतल्यामुळे पुर्वी फॉर्म भरलेल्यांपैकी सदर इच्छुक लाभार्थी सोडतीत भाग घेणेस अपात्र ठरतील.

४) क्र.२ नुसार सादर होणारे अर्ज नागरी सुविधा केंद्रामार्फत पडताळणी करावयाची झालेस सदर केंद्रांना आवश्यक प्रशिक्षण, माहिती व तंत्रज्ञान विभाग व CLTC मार्फत देणेत येईल व प्रत्यक्ष फॉर्मचे तपासणी व पडताळणी फी म्हणून नागरी सुविधा केंद्रास र.रु.२५/- प्रति फॉर्म पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत अदा करणेत येईल.

५) सदर प्रक्रियेचा कालावधी ३० दिवस राहील.

६) सर्व पात्र लाभार्थ्यांची यादी ऑनलाईन वेबसाईटवर प्रसिध्द करुन लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रत्येक प्रकल्पाकरीताचे लाभार्थी निश्चित करणेत येतील.

७) इच्छुक लाभार्थींनी भरावयाच्या फॉर्ममध्ये तीन प्रकल्पांचा विकल्प भरणेस मुभा असेल.

८) र.रु.५०००/- ही सदनिकेच्या किंमतीतून वजावट करणेत येईल व सदनिका न मिळालेल्या लाभार्थींना सदर रक्कम परत करणेत येईल.

९) प्रतिक्षा यादी ठेवणे अथवा रद्द करणेचा कायदेशीर अधिकार मनपाने राखून ठेवलेले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील खालील प्रकल्पांची सद्यस्थितीत वाटप करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे. सदर प्रकल्पांना पर्यावरण दाखला व महारेरा अंतर्गत नोंदणी देखील करण्यात आलेली आहे. या प्रत्येक प्रकल्पांचे निविदेनुसार होणाऱ्या खर्चावर आधारीत प्रति सदनिका खर्च निश्चित केलेला आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी लाभार्थी हिस्सा खालीलप्रमाणे प्रपत्र अ नुसार येत आहे.

**<u>प्रपत्र अ</u>**

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | एकुण सदनिका | प्रति सदनिकेची बांधकाम किंमत (लाखात.रु.र) | प्रति सदनिका केंद्र शासन अनुदान (लाखात.रु.र) | प्रति सदनिका राज्य शासन अनुदान (लाखात.रु.र) | प्रति सदनिका लाभार्थी हिस्सा रू .र) (लाखात |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-्होली | १४४२ | ९१९. | १५०. | १००. | ६६९. |
| २ | रावेत | ९३४ | ९४५. | १५०. | १००. | ६९५. |
| ३ | बो-्हाडेवाडी | १२८८ | ८७१. | १५०. | १००. | ६२१. |
| | **एकुण** | **३६६४** | | | | |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे प्रति सदनिकेसाठी केंद्रशासन र.रु.१.५० लाख, राज्य शासन र.रु.१ लाख अनुदान देणार आहे. तसेच उर्वरित रक्कम हा लाभार्थी हिस्सा राहणार असून तो ३ टप्प्यांमध्ये (४०%+४०%+२०%) लाभार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे आर्थिकदृष्ट्या अतिकार्यक्षम व अतिव्यवहार्य (Most Economical Feasiblity) वसुलीच्या पर्यायापैकी लाभार्थीकडून घरकुलच्या किंमतीपोटी वसूल करावयाचे हिश्श्याची रक्कम वरीलप्रमाणे असून सदर रक्कम बांधकामाच्या ठराविक टप्प्यानंतर घेणेत येणार आहे. हिश्श्याचे टप्पे रेरा नियमानुसार ठेवण्यात आलेले आहे. तसेच सदर प्रकल्पामधील मुलभूत सुविधा विषयक (Infra Work) कामे, भाववाढ फरक अदायगी ही पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत करण्यात येणार आहे. म्हणजेच महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग म्हणून सदर प्रकल्प मनपाचे जागांवर करणे व प्रकल्पातील सुविधा पुरविणेचा खर्च, विकास शुल्क माफी व भाववाढ खर्च, अस्थापना खर्च या स्वरुपात असणार आहे.

सदर प्रकल्पांचे एकुण ३६६४ सदनिकांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणे आवश्यक आहे. तरी च-होली, रावेत व बो-हाडेवाडी येथील प्रकल्पांसाठी लाभार्थी व लाभार्थी हिस्सा व सोडत प्रक्रिया निश्चित करणेचा वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(टिप- माहे फेब्रूवारी-२०२० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

**विषय क्रमांक १३) संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.वायसीएमएच/१७/कावि/३६/२०२० दि.१८/१/२०२०

महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात उपचार घेत असताना मृत्यु झाल्याने तसेच सदर रुग्णांची अर्थिक परिस्थिती हालाखिची असल्याने त्यांच्यावर करण्यात

आलेल्या औषधोपचाराचे एकुण बील रक्कम रुपये ४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस) वसुल करणे शक्य नसल्याने ते क्षमापित करणे आवश्यक आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र. ४३१ दि. ७/९/२०१९ अन्वये रुग्णांची बेताची आर्थिक परिस्थिती व मानवतेच्या दृष्टीकोनातुन महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह मनपाच्या सर्व रुग्णालयात उपचाराकरीता दाखल झालेल्या रुग्णाचा उपचार चालु असताना किंवा रुग्णालयात दाखल असताना मृत्यु झाल्यास सदर रुग्णाचे मृत्युसमयी असणारे थकीत बील माफ करणेस मान्यता दिलेली आहे.

श्री.वामन श्रीपती वाघमारे नामक रुग्णांस दिनांक ११/०२/२०१८ रोजी वाय.सी.एम.रुग्णालयात उपचाराकरीता दाखल केलेले होते. सदर रुग्णांवर वाय.सी.एम. रुग्णालयात दि.११/०२/२०१८ ते दि. २७/०३/२०१८ या कालावधीत औषध उपचार केलेले आहेत. सदर रुग्ण दिनांक २७/०३/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. सदर रुग्णांवर दिनांक २७/०३/२०१८ अखेर केलेल्या औषध उपचाराचे एकुण बील र.रु. ४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस) झालेले आहेत. परंतु रुग्णांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने सदर बिलापैकी र.रु. २०,०००/-(अक्षरीर.रु. वीसहजार) मा.योगेश बहल, नगरसेवक यांचे सांगणेवरुन माफ केलेले आहे. सदर बिलापैकी उर्वरीत र.रु. २७,९४६/-(अक्षरी र.रु. सत्तावीस हजार नऊशे शेहचाळीस) भरणेबाबत मयत व्यक्ती वामन श्रीपती वाघमारे यांचे नातेवाईक श्री. मारुती बाबु मांजरे, ओटा स्किम, रुपीनगर, निगडी, यांना या कार्यालयाकडील पत्र क्र.वायसीएमएच/८ब/कावि/४३२/ २०१९ दि. ०२/०३/२०१९ अन्वये कळविले होते. तथापि, “तपास लागत नाही, सबब परत”असा पोस्टाचा शेरा नमुद करुन सदरचे पत्र परत आलेले आहे.

मयत व्यक्ती वामन श्रीपती वाघमारे यांचे उपचाराची थकीत रक्कम वसुल होणे शक्य नाही. मानवतेच्या दृष्टीकोनातुन मा.योगेश बहल, नगरसेवक यांच्या सांगणेवरुन एकुण र.रु.४७,९४६/- (अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस) पैकी र. रु.२०,०००/-(अक्षरी र. रु. वीस हजार) माफ केलेले असले तरी सदर एकुण रक्कम रु.४७,९४६/-(अक्षरी र.रु सत्तेचाळीस हजार नऊशे शेहचाळीस) क्षमापित करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरची रक्कम लेखा परीक्षणामध्ये आक्षेपाधीन निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर रक्कम क्षमापित करणे बाबत मा.स्थायी समितीने दि. २७/१२/२०१९ रोजी विषय क्रमांक ७३, ठराव क्रमांक ६२३८ नुसार मान्यता दिलेली आहे.

मा. मुख्य लेखापरिक्षक यांचे दि. ५/११/२०१९चे शेराकंनानुसार सदर रक्कम क्षमापित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक १४) संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.नरवि/कावि/१२/२३/२०२० दि.२२/१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीसर-२६१/नवि-२२, दि ११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून , शासन निर्णय क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी /नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखडयातील मौजे दिघी येथील स.नं ८७ पै व ६४ पै मध्ये आरक्षण क्र. २/१३३ टेलिकॉम सेंटर (Telecom Center) या प्रयोजनाकरिता ४० आर क्षेत्र आरक्षीत आहे.

सदर आरक्षण बाबत अर्जदार श्री प्रमोद वसंत बेलसरे यांनी म.प्रा.व नर.अधिनियम १९६६ कलम ४९ अन्वये शासनास नोटीस दिली होती. दि.०४/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना इकडील विभागामार्फत संविस्तर अहवाल पाठविण्यात आला व सदर अहवानुसार विषयांकित आरक्षण पुणे – आळंदी रस्त्यालगत असून बीआरटी रस्त्यालगत वाहनतळ व तत्सम सुविधा उपलब्ध करण्यासाठी सदर जागा मनपास उपयुक्त ठरेल व त्यामुळे उक्त आरक्षण कलम ५० अन्वये रद्द होण्याऐवजी मनपा म.प्रा.व नर.अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये उक्त आरक्षणाचे प्रयोजन बदलून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मा. महापालिका सभेच्या मान्येतेने विहित कार्यवाही पूर्ण करून सादर करेल असे कळविणेत आले होते.

त्यानुसार दि.०५/०१/२०१८ रोजी शासनाकडे सुनावणी झाली. तसेच दि. ०५/०२/२०१८ चे पत्रान्वये सहाय्यक महाव्यवस्थापक, बी.एस.एन.एल यांनी मा.उप सचिव ,नगर विकास विभाग यांना सदर उक्त आरक्षण बाबत त्यांना आवश्यकता नसून सदर आरक्षण रद्द करणे बाबत विनंती केली होती व सदर पत्राची प्रत इकडील विभागास पाठविण्यात आलेली होती.

वरील सुनावणी च्या शासनाकडील दि.२३/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उक्त आरक्षण बाबत कलम ५० अन्वये रद्द होण्याऐवजी कलम ३७ अन्वये उक्त आरक्षणाचे प्रयोजन बदलून फेररबदलाचा प्रस्ताव शासनास महापालिका सभेच्या मान्यतेने विहित कार्यवाही पूर्ण करून सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखड्यातील मौजे दिघी येथील स.नं ८७ पै,६४ पै मधील आरक्षण क्र. २/१३३ टेलिकॉम सेंटर (Telecom Center) या प्रयोजनाकरिता ४० आर क्षेत्र पुणे – आळंदी रस्त्यालगत असून बीआरटी रस्त्यालगत वाहनतळ व तत्सम सुविधा उपलब्ध करण्यासाठी सदर जागा मनपास उपयुक्त ठरेल असे मत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा टेलिकॉम सेंटर ऐवजी वाहनतळ व तत्सम सुविधा या वापरासाठी असा बदल करणेस मान्यता मिळणे कामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी येथील स.नं ८७ व ६४ पै ४००० चौ.मी क्षेत्राचे आ.क्र.२/१३३ “टेलिकॉम सेंटर” या प्रयोजनाऐवजी “ वाहनतळ व तत्सम सुविधा “ असे प्रयोजन करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मान्यता व फेरबदलाची पुढील वैद्यानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १५) संदर्भ-** १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/२१/२०२० दिनांक ५/०२/२०२०

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०१/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १८०५३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १८०५३ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १५४८९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१५४६९ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-१०६७९<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४७९० |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ११०३८ लाभार्थी | GOI+GOM=६६२.२८लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २२०.७६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८८३.०४ लाख** | |
| निर्गत करणेत | १०३९५ | GOI+GOM=४१५.८०लाख | GOI = २०००/-व |

| | | | |
|---|---|---|---|
| आलेला<br><br>दुसरा हप्ता | लाभार्थी | | GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =२०७.९० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६२३.७ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

------

**समित्यांचे अहवाल**

**मा.विधी समिती**

**विषय क्रमांक १६)** अ) दिनांक ०३/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक १७/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**मा.महिला व बालकल्याण समिती**

**विषय क्रमांक १७)** अ) दिनांक २६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक ०९/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

**मा.शहर सुधारणा समिती**

**विषय क्रमांक १८)** अ) दिनांक २६/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक ०८/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

**मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती**

**विषय क्रमांक १९)** अ) दिनांक १३/१२/२०१९, १६/१२/२०१९ व २७/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २७/१२/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

## मा.शिक्षण समिती सभा

**विषय क्रमांक २०)** अ) दिनांक ०२/०१/२०२० व ०४/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक १६/०१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/४३/२०२०
दिनांक : ११/०२/२०२०

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस् ) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

---

टिप : १) " पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्या विषयीचे जादा नियम " यामधील नियम क्र.१९ अन्वये करांचे दर निश्चिती संबंधी होणारी चर्चा दि.१५ फेब्रुवारी २०२० ला किंवा तत्पुर्वी समाप्त करावयास पाहिजे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील कलम ९९ अन्वये करांचे दर दि.२० फेब्रुवारी २०२० ला किंवा तत्पुर्वी निश्चित केले पाहिजेत.

(मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. ६६५४ दि.५/२/२०२० चे लगत)

प्रपत्र 'अ'

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

वैद्यकिय विभागांतर्गत आवश्यक मनुष्यबळ संख्या

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ | ०६ |
| २ | बालरोग तज्ञ | ०७ |
| ३ | भुलतज्ञ | ०६ |
| ४ | फिजिशियन | ०६ |
| ५ | रेडिओलॉजिस्ट | ०१ |
| ६ | नेत्ररोग तज्ञ | ०१ |
| ७ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) | १२ |
| ८ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबी एस / बीएएमएस) | ०९ |
| ९ | निवासी वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस / बीएएमएस) | १४ |
| १० | दंतशल्य चिकित्सक | ०३ |
| ११ | फार्मासिस्ट | ११ |
| १२ | स्टाफनर्स | ३९ |
| १३ | लॅब टेक्निशियन | ०५ |
| १४ | एक्स रे टेक्निशियन | ०१ |
| १५ | सफाई सेवक (महिला) | २६ |

E:\ABB\Mandhan2020\Jan2020\Recruitment.docx

प्रपत्र 'ब'

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत आवश्यक मनुष्यबळ संख्या

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | ब्लड बँक टेक्निशियन | ०२ |
| २ | ब्लड बँक कौन्सिलर | ०१ |
| ३ | एम.एस.डब्ल्यु. | ०१ |
| ४ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ०५ |
| ५ | डायलिसीस टेक्निशियन | ०१ |
| ६ | फार्मासिस्ट | ०५ |
| ७ | एक्स रे टेक्निशियन | ०३ |
| ८ | जी.एन.एम.स्टाफनर्स | ६६ |
| ९ | लॅब टेक्निशियन | ०३ |
| १० | पुरुष कक्ष मदतनीस | ०५ |
| ११ | स्त्री कक्ष मदतनीस | ०५ |